# फौजदारी किरकोळ अर्ज क्र.९१/२०२२

## निशाणी क्र.२४ खालील आदेश

०१. प्रस्तुतचा अर्ज हा सामनेवाला यांनी लेखी कैफियतमध्ये वाढीव मजकूर घालून दुरुस्ती करण्याकरीता सादर केला आहे.

०२. सामनेवाला यांचे असे कथन आहे की, अर्जदार क्र.२ ही आजरोजी सज्ञान असून रिध्दी सिध्दी हॉस्पीटल, नालासोपारा, जि.पालघर येथे नर्स म्हणून नोकरीस आहे व तिला दरमहा रु.१७,०००/– पगार मिळतो. सदर बाब अर्जदार यांनी त्यांचे अर्जाचे कामी लपवुन ठेवून सामनेवाला यांच्याकडून पोटगीची मागणी करीत आहे. त्यामुळे सदर बाब पुराव्यामध्ये येणे गरजेचे असल्याने सामनेवाला यांच्या म्हणण्यामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सदर दुरुस्तीमुळे सामनेवाला यांनी दाखल केलेल्या म्हणण्याच्या मुळ गाभ्यात कोणताही बदल होणार नाही.

०३. प्रस्तुत अर्जावर अर्जदार हिने म्हणणे देऊन अर्जाला विरोध दर्शविला. अर्जदाराचे असे कथन आहे की, सामनेवाला यांना अशा प्रकारचा अर्ज करुन अर्जदाराबाबतची आर्थिक जबाबदारी नाकारता येणार नाही. अर्जदार क्र.२ ही जरी सज्ञान असली तरी ती अविवाहित आहे. अर्जदार क्र.२ हिचे शिक्षणाकरीता झालेला खर्च अर्जदार ही मागत असून सामनेवाला यांना नाकारता येणार नाही. अर्जदार क्र.२ ही अद्याप स्वतःचा चरितार्थ सांभाळण्यास सक्षम नाही. सबब, सदरचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

०४. अर्जदाराकरीता विधीज्ञ श्री. बुटाला यांनी युक्तिवाद केला की, अर्जदाराने तिच्या सरतपासाचे प्रतिज्ञापत्र सादर केल्यानंतर सामनेवाला यांनी सदरचा अर्ज केला आहे, त्यामुळे ज्याअर्थी प्रस्तुतचे प्रकरण हे पुराव्याला लागले त्याअर्थी सामनेवाला यास अशा प्रकारचा अर्ज करता येत नाही. अर्जदार जरी सज्ञान असली व ती नर्स म्हणून नोकरी करीत असली तरी तिला सामनेवालापासून पोटगी मागण्याचा अधिकार आहे व सामनेवाला ती नाकारु शकत नाही.

०५. सामनेवालाकरीता विधीज्ञ श्री.भोसले यांनी युक्तिवाद केला की, अर्जदार ही नर्स म्हणून नोकरी करते व तिला दरमहा पगार मिळतो, परंतु सदर बाब त्यांनी जाणुन–बुजून लपवुन ठेवली. जरी अर्जदार हिने तिचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र सादर केले असले तरी अद्याप तिचा उलटतपास सुरु झालेला नाही. अशा परिस्थितीत सामनेवाला यास त्याच्या म्हणण्यामध्ये दुरूस्ती करण्यास परवानगी देता येईल. उलटतपासाच्या अनुषंगाने सामनेवाला यास त्यांच्या म्हणण्यामध्ये अर्जदार क्र.२ विषयी मजकुर घालणे आवश्यक आहे अन्यथा त्याबाबत सामनेवाला यास अर्जदाराचा उलटतपास घेता येणार नाही.

**०६.** अर्जातील कथन व त्यावर अर्जदाराने दिलेले म्हणणे विचारात घेतले. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला. नमुद करण्यासारखी बाब म्हणजे यापूर्वी अर्जदारास मुळ अर्जामध्ये अर्जदार क्र.२ हिच्या शिक्षणाबाबत व त्याकरीता आलेला शैक्षणिक खर्च याबाबत मजकुर घालुन अर्जामध्ये दुरुस्ती करुन घेतली आहे. अर्जदाराने अर्जदार क्र.२ हिच्या शैक्षणिक फीच्या पावत्या तसेच खानावळीच्या पावत्या हजर केल्या आहेत. शैक्षणिक फीच्या पावत्यांवरुन असे दिसून येते की, अर्जदार हिने तीन वर्षांचा नर्सिंगचा कोर्स केलेला आहे व तिचे शेवटचे शैक्षणिक वर्ष हे २०२४–२५ असे आहे. अर्जदार क्र.२ हिचे शिक्षण पुर्ण झाल्यानंतर अर्जदार क्र.१ हिने तिचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दि.०९.०९.२०२५ रोजी सादर केले आहे. अर्जदार क्र.२ ही अर्जदार क्र.१ कडे राहत असल्यामुळे ती नर्स म्हणून नोकरी करते व तिला दरमहा पगार मिळतो ही बाब सामनेवाला यास तद्नंतर माहिती झाली असे दिसून येते. ज्याअर्थी अर्जदाराने मुळ अर्जामध्ये अर्जदार क्र.२ च्या शिक्षणाची बाब दुरुस्त करुन घेतली, त्याअर्थी सामनेवाला यास अनुषंगिक दुरुस्ती करण्याची परवानगी नाकारल्यास ते नैसर्गिक न्यायतत्वांच्या विरोधात होईल. महत्त्वाची बाब म्हणजे अर्जदाराने मुळ अर्ज हा न्यायालयाने मंजूर केलेल्या पोटगीमध्ये वाढ करुन मिळण्यासाठी सादर केला आहे. मुळ अर्ज निकाली करण्यासाठी व सदर अर्ज मंजूर होत असेल तर वाढीव पोटगीची रक्कम निश्चित करण्यासाठी सामनेवाला यांनी प्रस्तुत विचाराधीन अर्जामध्ये नमुद केलेली बाब अभिलेखावर आल्यास त्याची मदतच होणार आहे. सदर दुरुस्ती ही परिस्थितीमध्ये बदल या सदराखाली सुध्दा विचारात घेता येईल. प्रस्तावित सुधारणा अर्जदाराच्या हितास बाधत नाही. सबब, सदरचा अर्ज हा मंजूर करण्यालायक आहे. करीता, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१. अर्ज **निशाणी २४** मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाला यांनी विनाविलंब आपल्या म्हणण्यामध्ये दुरुस्ती करावी.

CHAVAN SANJAY MOTIRAM
Digitally signed by CHAVAN SANJAY MOTIRAM
Date: 2026.03.30 13:44:53 +0530

**(एस. एम. चव्हाण)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खेड
ता. खेड, जि. रत्नागिरी.

**दिनांक – २७.०३.२०२६**

CERTIFICATE

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | Cri.M.A.No.91/2022 |
| I affirm that the contents of this pdf file order are same word as per original Judgment/order. | | |
| Name of Stenographer | : | Sou. S. J. Salunkhe |
| Court Name | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C. Court, Khed. |
| Date of Decision | : | 27.03.2026 |
| Judgment/Order signed by Presiding Officer on | : | 27.03.2026 |
| Judgment/Order uploaded on | : | 30.03.2026 |